६७

क्रमांकःएसआरव्ही-२००९/प्र.क्र.१६५/१२
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :-१४.९.२००९.

प्रति,

१) प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग,
२) सचिव (व्यय) वित्त विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

**विषय : मानीव दिनांक मंजूरीबाबत.**

महोदय,

वरील विषयाबाबत प्रधान सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखाली दि.७.९.२००९ रोजी झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त माहितीसाठी सोबत जोडले आहे.

आपला,

(श्री.प्र.पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीसाठी (बैठकीच्या कार्यवृत्ताच्या प्रतीसह),
१) प्रधान सचिव (सेवा) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
२) सर्व प्रशासकीय विभाग (आस्थापना)
यांना विनंती करण्यात येते की, सदर कार्यवृत्ताची प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी सर्व संबंधित कार्यासनांना देण्यात यावी.

G:/Varishtha Sachiv Samiti -T. R..lwp

## बैठकीचे इतिवृत्त

"मानीव दिनांक मंजूरीबाबत" या विषयावर प्रधान सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखाली दि.७.९.२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता बैठक आयोजित केली होती. या बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते:-

१) सचिव (व्यय), वित्त विभाग,

२) श्री. एस.जी.सातपूते, उपसचिव (वित्त विभाग),

३) श्री.श्री.प्र.पाटील, उपसचिव (सा.प्र.वि.)

सदर बैठकीत खालील मुद्यांवर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले:-

| अ.क्र. | मुददा | निर्णय |
|---|---|---|
| १ | यापुर्वी तत्कालिन अपर मुख्य सचिव (सेवा) व प्रधान सचिव (वित्त) यांच्यामध्ये झालेल्या बैठकीचे / चर्चेचे इतिवृत्त निर्गमित करण्याचा मुददा वित्त विभागाकडून उपस्थित झाला. | यापुर्वी अशी बैठक/चर्चा झाल्याचे तत्कालिन अ.मु.स (सेवा) यांनी सा.प्र.वि.तील संबंधित अधिका-यांना/कार्यासनास कळविले नसल्याने इतिवृत्त निर्गमित करण्यात आले नाही. या विषयाबाबत उपस्थित होत असलेल्या मुद्यांसंदर्भात प्रस्तूत बैठकीत निर्णय झाल्यावर त्यासंबंधीचे कार्यवृत्त निर्गमित करण्यात येईल असे स्पष्ट केल्यावर वित्त विभागाने त्यास मान्यता दिली. |
| २ | कनिष्ठाच्या नियमित पदोन्नतीचा दिनांक हा ज्येष्ठ अधिका-यास मानीव दिनांक म्हणून देता येतो. तथापि काही वेळा सरळसेवेच्या कोटयातील पदावर अथवा तदर्थ स्वरुपात दिलेल्या पदोन्नतीचा दिनांक हा मानीव दिनांक म्हणून देण्यास सा.प्र.वि. ने सहमती दिली असल्याचे निदर्शनास आल्याचे वित्त विभागाने नमूद केले. | पदोन्नती नियमित होण्यास / पदोन्नतीस लोकसेवा आयोगाची मान्यता मिळण्यास बराच कालावधी लागतो हे लक्षात घेऊन कनिष्ठाची पदोन्नती नियमित केल्याचे आदेश काढले नसताना, अथवा कनिष्ठाच्या पदोन्नतीस (संबंधित निवडसूचीस) लोकसेवा आयोगाची मान्यता घेतली नसताना कनिष्ठाच्या पदोन्नतीचा दिनांक हा मानीव दिनांक म्हणून देण्यास सहमती देण्यात यावी. मात्र संबंधित कनिष्ठास पदोन्नती कोटयातील पदावर पदोन्नती दिली असावी. तसेच सरळसेवेच्या कोटयातील पदावर अथवा तदर्थ स्वरुपात दिलेल्या पदोन्नतीचा दिनांक हा मानीव दिनांक म्हणून देण्यास मान्यता देण्यात येणार नाही किंवा असे प्रस्ताव वि.वि. कडे शिफारस करुन पाठविण्यात येणार नाहीत याबाबत यापुढे अधिक काटेकोरपणे दक्षता घेण्यात येईल असे सा.प्र.वि. ने मान्य केले. |

| | | |
|---|---|---|
| ३ | महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८२ मधील नियम ३२ मधील तरतदीनुसार, बढतीच्या पदाची कर्तव्ये स्वीकारल्यानंतर त्या पदाचे वेतन देय होते. त्यामुळे सेवानिवृत्तीपुर्वी प्रत्यक्ष पदोन्नती न मिळालेल्या अधिकारी/ कर्मचा-यास मानीव दिनांक देण्यासाठी सदर नियम शिथिल करावा लागतो व त्यास वित्त विभागाची मान्यता आवश्यक असते. तथापि अशाप्रकारे सदर नियम शिथिल करण्याचे प्रस्ताव वित्त विभागास सदर्भित करु नयेत असे वित्त विभागाने सूचविले. | वित्त विभागाची सूचना / आग्रह विचारात घेऊन, सदर नियम शिथिल करुन मानीव दिनांक देण्याचे प्रस्ताव वित्त विभागास संदर्भित करु नयेत असे मान्य करण्यात आले. मात्र न्यायनिर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी काही प्रकरणी सदर नियम शिथिल करुन मानीव दिनांक देणे क्रमाप्राप्त असते असे सा.प्र.वि. ने निदर्शनास आणले असता अशी प्रकरणे वगळता अन्य प्रकरणे वित्त विभागास संदर्भित करु नयेत असे वित्त विभागाने स्पष्ट केले. |
| ४ | मानीव दिनांकाच्या प्रस्तावास सा.प्र.वि. व वि.वि. ची मान्यता मिळाल्यानंतर संबंधित विभागाकडून शासनाची मान्यता घेण्यात येत नाही. | पदोन्नतीच्या प्रस्तावास ज्याप्रमाणे शासनाची मान्यता घेण्यात येते त्याचप्रमाणे पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्याच्या प्रस्तावास सा.प्र.वि. व वि.वि. ची मान्यता मिळाल्यावर शासनाची मान्यता घेणे अपेक्षित आहे. सबब मानीव दिनांकाची प्रकरणे मान्य करताना शासनाची मान्यता घेतल्यानंतरच मानीव दिनांकाचे आदेश निर्गमित करण्याबाबत संबंधित विभागास कळविण्यात येईल. |
| ५. | विभागीय चौकशी/फौजदारी प्रकरण/ लाचलूचपत प्रकरण/निलंबन इ. कार्यवाही चालू असलेल्या प्रकरणी मानीव दिनांक मंजूर न करणे. | विभागीय चौकशी/फौजदारी प्रकरण/ लाचलूचपत प्रकरण/निलंबन इ. कार्यवाही ज्या अधिका-यांच्या बाबतीत सुरु आहे त्या प्रकरणी अंतिम निर्णय झाल्यानंतरच मानीव दिनांकाच्या प्रस्तावावर निर्णय घेण्यात यावा. |